# गोखले महाविद्यालयात कृषी, पर्यटन पदवी अभ्यासक्रम सुरू

## टुरिझम अँड सर्व्हिस इंडस्ट्रीज, सस्टेनेबल ॲग्रीकल्चर मॅनेजमेंटला 'युजीसी'ची मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

येथील गोपाल कृष्ण गोखले महाविद्यालयात या शैक्षणिक वर्षांपासून टुरिझम अँड सर्व्हिस इंडस्ट्रीज व सस्टेनेबल ॲग्रिकल्चर मॅनेजमेंट पदवी प्रमाणपत्राचे व्होकेशनल अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. या दोन्ही अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) ची मान्यता मिळाली आहे, अशी माहिती शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रशासन अधिकारी, डॉ. मंजिरी मोरे–देसाई यांनी पत्रकार परिषदेत दिली.

- डॉ. मंजिरी मोरे- देसाई यांची माहिती
- 'कौशल्य विकास' अंतर्गत अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

त्या म्हणाल्या, कौशल्यावर आधारित या दोन्ही अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी ५० जागांना युजीसीने परवानगी दिली आहे. कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण झालेले, आयटीआय तसेच, डिप्लोमा व इंजिनिअरिंग पदवी प्राप्त उमेदवार प्रवेश घेऊ शकतात. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिकावर भर दिला जाणार आहे. या माध्यमातून कृषी व व पर्यटन क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना नोकरी व व्यवसायाची संधी उपलब्ध होणार आहे. तरी याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन केले आहे.

त्या म्हणाल्या, अभ्यासक्रमांतर्गत शैलेश नर्सरी, मलकापूर, निसर्ग नर्सरी कोल्हापूर, रसिका ट्रॅव्हल्स, एम.एम. ग्रुप ॲग्रो टूरिझम, शिवाजी विद्यापीठ भूगोल विभाग, माती परिक्षण शासकीय प्रयोगशाळा यांच्याशी महाविद्यालयाने सामंजस्य करार केले आहेत. त्यांतर्गत विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणाची संधी उपलब्ध केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. जयकुमार देसाई, पेट्रन कौन्सिल सदस्य दौलत देसाई, एन. एन. आत्तार, सुबोध भिंगार्डे, प्राचार्य डॉ. ए. के. गडकरी, उपप्राचार्य प्रा. एस. एच. पिसाळ, प्रा. आर. पी. जाधव, प्रा. एस. ए. मेणशी, डॉ. ए. ए. कुलकर्णी, एस. आर. घाटगे, प्रा. पी. बी. झावरे, प्रा. आर. बी. सुतार उपस्थित होते.

# 'गोखले'त व्होकेशनल अभ्यासक्रम

## टुरिझम सर्व्हिस इंडस्ट्रीज व ॲग्रीकल्चर मॅनेजमेंटचे प्रवेश सुरू

**कोल्हापूर, ता. ३० :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मान्यतेने गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयात बॅचलर ऑफ व्होकेशनल या अभ्यासक्रमाची सुरवात झाली आहे. याअंतर्गत टुरिझम सर्व्हिस इंडस्ट्रीज व ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट हे पदवी अभ्याक्रम मंजूर झाले आहेत. शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रशासन अधिकारी मंजिरी मोरे-देसाई यांनी पत्रकार बैठकीत ही माहिती दिली.

गोपालकृष्ण गोखले महाविद्यालयात टुरिझम सर्व्हिस इंडस्ट्रीज व ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट अभ्याक्रम या वर्षी पासून सुरू केले आहेत. शैलेश नर्सरी मलकापूर, निसर्ग नर्सरी कोल्हापूर, रसिका ट्रॅव्हल्स, एम. एम. ग्रुप ॲग्रो टुरिझम, भूगोल विभाग शिवाजी विद्यापीठ व माती परीक्षण प्रयोगशाळा महाराष्ट्र शासन यांच्याशी संस्थेचे सामंजस्य करार झाले आहेत. या दोन्ही अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी ५० जागा उपलब्ध आहेत. बारावी उत्तीर्ण असलेल्या कोणत्याही शाखेच्या विद्यार्थ्याला प्रवेश घेता येणार आहे. यासाठी वयाची अट नाही. तीन वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या काळात विद्यार्थ्यांचा खंड पडल्यास त्यांना त्यांचा अभ्यासक्रम कधीही पूर्ववत करता येणार आहे. ६० टक्के प्रात्यक्षिकावर आधारित हा अभ्यासक्रम आहे.

या अभ्याक्रमांसाठी नोंदणी सुरू असून इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

या शिवाय केंद्र सरकारच्या प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेअंतर्गत कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांसाठी २ महिन्याचे सर्टिफिकेट कोर्स सुरू केल्याचे या वेळी सांगण्यात आले.

शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयकुमार देसाई, रसिका ट्रॅव्हल्सचे एन. एन. अत्तार, शैलेश नर्सरीचे सुबोध भिंगार्डे, प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, उपप्राचार्य प्रा. एस. एच. पिसाळ, प्रा. आर. पी. जाधव, प्रा. एस. ए. मेनशी, प्रा. डॉ. ए. ए. कुलकर्णी उपस्थित होते.

# गोखले कॉलेजमध्ये टुरिझम अभ्यासक्रम

कोल्हापूर टाइम्स टीम

यूजीसीने गोपाळकृष्ण गोखले कॉलेजमध्ये बॅचलर ऑफ व्होकेशनल अभ्यासक्रमातंर्गत टुरिझम इंडस्ट्री व सस्टेबल ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट हे दोन कोर्स सुरू करण्यास यूजीसीने मान्यता दिल्याची माहिती शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयकुमार देसाई व प्रशासन अधिकारी डॉ. मंजिरी देसाई यांनी दिली.

देसाई म्हणाले, या दोन पदवी अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यवसायिक अभ्यासक्रमाची सोय होणार आहे. शेती व टुरिझम या दोन्ही अभ्यासक्रमाची अलिकडे गरज भासत आहे. पर्यटन व्यवसायाचे महत्त्व वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्रात करिअर करण्याची संधी आहे. शैलश नर्सरी मलकापूर, निसर्ग नर्सरी कोल्हापूर, रसिका ट्रव्हल्स, एम. एम. ग्रुप ॲग्रो टुरिझम, विद्यापीठाचा भूगोल विभाग व माती परिक्षण प्रयोगशाळा यांच्याशी करार केला आहे. यावेळी प्राचार्य ए. बी. गडकरी, उपप्राचार्य एस. एच. पिसाळ, प्रा. आर. पी. जाधव, आदी उपस्थित होते.